जा.क.म.सं.के/टेटवली–प्रअ/११३५/२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
टेटवली विभाग
दिनांक :– १८/०९/२०२३

## जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत टेटवली विभाग प्रक्षेत्राला मा. संशोधन संचालक, महोदय, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांनी सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात १०,००० नग वेंगुर्ला – ४, ६००० नग वेंगुर्ला – ७ कलमे अशी एकुण १६,००० नग काजु कलमे तयार करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. त्यानुसार १६,००० नग विक्री योग्य काजु कलमे तयार करण्याच्या उद्देशाने करावयाच्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क | कामाचा तपशिल<br>कामाचा कालावधी माहे ०१ नोव्हेंबर २०२३ ते माहे ३१ मे २०२४ | बांधावयाची विक्री योग्य कलमे |
|---|---|---|
| १. | काजु रोपांसाठी पिशव्या भरणे व वाहतुक करून लावणे. | १६,००० |
| २. | काजुची रोपे तयार करणे, पाणी घालणे, बेणणी करणे, फवारणी करणे. | |
| ३. | काजु फांद्या डिफॉलिएशन करणे. (४२००० काडया)<br>प्रक्षेत्रावरील मातृवृक्षावरून काजु अकुर काडया काढुन आणणे. (२३००० काडया) | |
| ४. | काजु रोपांवर कलमे बांधणे. (२३००० कलमे) | |
| ५. | बांधलेल्या कलमांची फुट काढणे, बेणणी करणे, पाणी देणे, फवारणी करणे, ड्रेंचींग करणे, कलमांच्या पट्टया सोडणे. (माहे १ जुन २०२४ रोजी ताब्यात देणे.) | |

उपरोक्त प्रमाणे कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमती पत्र आणि दरपत्रक नमुना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामांचे दरपत्रकामध्ये होणाऱ्या मजुरीच्या एकुण रक्कमेचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार कलेल्या नमुना पत्रामध्येच भरून द्यावयाचा आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक :–१० /१०/२०२३ पर्यत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे. पाठवावे. विहित दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **''टेटवली विभाग अंतर्गत काजु कलमे ठेका पध्दतीने बांधणे''** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून **मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (टेटवली विभाग)** यांचे नावे पाठवावा. पोस्टाद्वारे होणाऱ्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असुन त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली, जि. रत्नागिरी